169

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/ ६८०५/२०२२
दिनांक :१२/०७/२०२२.

"जाहिर नोटीस"
(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ व मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेचे या कार्यालयाचे नियोजन आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलली ही मिळकत घोषित नसल्याचे दिसून येते. तथापि, उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.उप-१/१७८८, दि.१३/०७/२०२० अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे. तसेच सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रत्यक्ष जागेवर दि.१६/०६/२०२२ रोजी स्थळपाहणी करणेत आली आहे. त्याबाबतचा अहवाल सोबत अवलोकनार्थ सादर केला असून सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती आढळून आली आहे. तसेच मोजणी नकाशानुसार त्रिकोणमिती पध्दतीने येणारे ४०००.०० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील " असे नमूद केले आहे.

Scanned with CamScanner

आणि ज्याअर्थी, या नोटीसाद्वारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे. आणि;

त्याअर्थी, या अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२ यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

महानगरपालिकेचे नाव :- पुणे महानगरपालिका
झोपडपट्टीचे नाव :- स.नं.९४/१३/१, सि.स.नं.२८८१/१, आरोग्य भवन, येरवडा, पुणे

| गाव | फा.प्लॉ.क्र./सि. स.न. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे येरवडा | स.नं.९४/१३/१, सि.स.नं.२८८१/१ | शासकीय (महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था) | ४०००.०० चौ.मी. | पुर्वेस - न.भू.क्र. २८८५ ते २८८९ पैकी व लागू रस्ता | |
| | | | | पश्चिमेस - स.नं.९४ पैकी व न.भू.क्र. २८८१ पैकी व न.भू.क्र. २८९० | |
| | | | | दक्षिणेस - स.नं.९४ पैकी व न.भू.क्र. २८८१ पैकी | |
| | | | | उत्तरेस - स.नं.९४ पैकी व न.भू.क्र. २८८१ पैकी व न.भू.क्र. २८८४ पैकी | |

सदरची नोटीस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

12.7.2022

(राजेंद्र निंबाळकर) भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १२/०७/२०२२
प्रत-

१. जमीन मालक महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, आर.एन.जी. रोड, विश्रांतवाडी, आरटीओ ऑफीस जवळ, येरवडा, पुणे-४११००६ - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
२. मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीस्तव सादर.
३. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर.

Scanned with CamScanner